# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १६१-२३** **दिनांक :- १९/०५/२०२३**

### पैशाची गरज असलेल्या कॉलेजच्या मुलींना हेरुन वेश्याव्यवसायास प्रवृत्त करुन घरामध्ये वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या महिलेस अटक करुन ०१ पिडित कॉलेजच्या मुलीची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक १८.०५.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर युनिटला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, महिला वेश्यादलाल सायरा शेख उर्फ दिव्या मंगलकर रा. नवघर, भाईंदर पुर्व हि वेश्याव्यवसाय करीत असुन तिचा मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला असता ती व्हॉटसॲपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन पाठवलेल्या फोटोतील पुरुष गिऱ्हाईकांनी मुलीचा फोटो पसंत केल्यानंतर वेश्यागमनाचा मोबदला ठरवुन तिचे राहते घरी वेश्यागनासाठी मुली पुरविते.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर युनिटचे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व पंच यांना महिला वेश्यादलाल सायरा शेख उर्फ दिव्या मंगलकर हिने तिचे राहते घरी रुम नं.३०२, जी विंग, सोनम क्रिष्णा कौ.हौ.सोसा.,न्यु गोल्डन नेस्ट, फेज-१०, नवघर, भाईंदर पुर्व येथे पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक १८/०५/२०२३ रोजी १५.२० वा. छापा कारवाई केली आसता महिला वेश्यादलाल सायरा शेख उर्फ दिव्या मंगलकर व तिची साथीदर आयेशा शेख (पाहिजे आरोपी) यांनी आपआपसात संगणमत करुन बोगस गिऱ्हाईकास मुलींचे फोटो पाठवुन तिस वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवुन तिचे राहत्या घरी बोलावुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वीकारल्याने तिस मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ पिडित मुलीची सुटका करण्यात आली. सदरबाबत पो.अंम. केशव शिंदे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन महिला वेश्यादलाल सायरा शेख उर्फ दिव्या मंगलकर व पाहिजे आरोपी आयेशा शेख यांचेविरुध्द नवघर पोलीस ठाणते गुन्हा रजि. नं. I ३३४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम. अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. शुभांगी मोकल सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

--------०००--------